रयत शिक्षण संथेचे,

अण्णासाहेव आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज,मंचर

मराठी विभाग

मराठी भाषा गौरव दिन

अहवाल – २०२४-२५

अहवाल

दि. २७.०२.२०२५

महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्मदिवस **"मराठी भाषा गौरव दिन" म्हणून** दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुनील सालके यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती विशेष "उन्मेष" या भित्तिपत्रकाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे गंगाधर अहिरे, अशोक बनसोडे, काशिनाथ वेलदोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

मराठी विभागच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यात गंगाधर अहिरे यांनी समाजात घडणाऱ्या घडामोडी व बदलती भाषा यावर भाष्य करून मातृभाषेबरोबर बोलीही टिकल्या पाहिजेत असे संगितले. या तीनही कवींनी आपआपल्या कविता सादर केल्या. तसेच या वेळी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी विभागप्रमुख प्रो.डॉ.गार्डी बी.पी.,प्रा.डॉ.पवार एस.पी., प्रा. मुंढे जी.डी.व डॉ. रूपनर एस.एस.व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस.गायकवाड करताना



“उन्मेष” या भित्तिपत्रकाच्या उद्घाटन प्रसंगी







मान्यवर कवी उपस्थितांना मार्गदर्शन व कविता सादर करताना







मान्यवरांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देताना

मराठी भाषा गौरव दिन बातमी

मातृभाषेबरोबरच बोलींचेही संवर्धन होणे गरजेचे : कवी गंगाधर आहिरे

आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही खरंच कौतुकास्पद आणि अभिमानाची गोष्ट आहे. मात्र एवढ्यावरच आपण न थांबता दैनंदिन जीवन व्यवहारांमध्ये जास्तीत जास्त आपण आपल्या बोलीभाषेचा वापर करणे गरजेचे आहे. कारण मातृभाषेला केवळ अभिजात भाषेचा दर्जा मिळून चालणार नाही तर त्याबरोबरच मातृभाषेच्या अनुषंगाने ज्या ज्या उपबोली भाषा आहेत त्या बोलींचेही संरक्षण व संवर्धन होणे ही एक गरज आहे. कारण आपण आपल्या भाषेतूनच जेव्हा व्यक्त होतो तेव्हा तेव्हा आपला आत्मविश्वास एका वेगळ्या स्तरावरती असतो म्हणून आजच्या या आधुनिक युगात बोलीही टिकल्या पाहिजेत असे वक्तव्य ज्येष्ठ कवी व भाष्यकार गंगाधर अहिरे यांनी केले. ते रयत शिक्षण संस्थेचे अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे 'मराठी भाषा गौरव दिना' निमित्त बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ते उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले आपण ज्या परिसरात राहतो, ज्या लोकांच्या सहवासात राहतो त्यांचा आपल्यावरती प्रभाव असतो आणि त्या प्रभावातूनच आपली भाषा घडत असल्याचे कथन केले. या कार्यक्रमास त्यांच्याबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून कवी अशोक बनसोडे, कवी काशिनाथ वेलदोडे हेही त्यांचे व्यासपीठावर उपस्थित होते. या कवींनी आपापल्या कविता सादर केल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सुनील सालके होते.या कार्यक्रम प्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त घेण्यात आलेल्या हस्ताक्षर स्पर्धा काव्यवाचन स्पर्धांमध्ये विजेत्या झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष पवार यांनी केले तर आभार विभागप्रमुख डॉ.बी.पी. गार्डी यांनी मानले ल. सूत्रसंचालन डॉ. रूपनर एस.एस.यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.